**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 20/11/2019 (बुधवार)**
**(सकाळ)**

---

## अनुसुचित जा. व ज. (अत्याचार प्रतिबंधक) कायदा व सामाजिक बहिष्कार कायद्यासंबंधाने कार्यशाळा संपन्न

दिनांक 19/11/2019 रोजी नागरी हक्क संरक्षण, नागपूर परिक्षेत्र, नागपूर तर्फे श्रीमती अपर्णा गिते, पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम 1989/2015, सामाजीक बहिष्कार अधिनियम 2016, मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स ॲक्ट 2013 या कायद्याच्या अमलबजावणी करीता आढावा बैठक व कार्यशाळा वसंतराव नाईक राज्य कृषी व्यवस्थापण प्रशिक्षण संस्था 'वनामती' अंतर्गत चिंतन सभागृह, धरमपेठ, नागपूर येथे घेण्यात आली. सदर कार्यशाळेचे संचालन श्री. डी.एस. दहातोंडे, स.पो.नि., नाहसं, पथक वर्धा यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्तावीक श्रीमती अपर्णा गिते, पोलीस अधिक्षक, ना.ह.सं., नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी केले. सदर कार्यक्रमात श्री. कैसर खालिद (भापोसे) विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह.सं., म.रा., मुंबई यांनी अजाअजअप्र कायदयाखाली दाखल गुन्हे, पोलीस तपासावरील गुन्हे, कोर्टातून निकाली लागलेल्या प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला. तपास अधिकारी यांच्या शंकाचे निराकरण केले. कार्यक्रमाचे उद्‌घाटक श्री. डॉ. भुषणकुमार उपाध्याय (भापोसे) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी 'तपासी अधिकाऱ्यांनी नमूद कायदयाखाली गुन्हा दाखल करणे हे किती गरजेचे आहे, गुन्हेगारी नियंत्रण किती महत्वाचे आहे' याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. डॉ. संजीव कुमार (भाप्रसे) विभागीय आयुक्त, नागपूर यांनी उपस्थितांना 'प्रशासनाने पिडीतांविषयी सहिष्णु असणे किती गरजेचे आहे' याबाबत मार्गदर्शन केले. श्री. प्रशांत साखरे, सरकारी अभियोक्ता यांनी 'सामाजीक बहिष्कार' व 'स्कॅव्हेंजर्स ॲक्ट' बाबत माहिती व महत्व पटवून दिले. तसेच श्री. अशोक बागुल, पोलीस निरीक्षक यांनी 'मानवाधिकार' या विषयावर माहिती दिली. सदर कार्यक्रमाला श्री. के.एस. मल्लिकार्जुन प्रसन्ना, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर, श्री. महादेव तांबडे, पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, श्री. बाबासाहेब देशमुख, सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर, श्री. नितीन तेलगोटे, जिल्हा सरकारी अभियोक्ता, नागपूर व परिक्षेत्रातील पोलीस अधिक्षक, पोलीस उपायुक्त, उप विभागीय अधिकारी, सहा. पोलीस आयुक्त यांचेसह 275 ते 300 वरीष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी हे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कुंदा तिडके, प्रभारी पोलीस उप अधिक्षक, ना.ह.सं. नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी होणेकरीता ना.ह.सं. नागपूर परिक्षेत्राच्या कुंदा तिडके, प्रभारी पोलीस उप अधिक्षक, स.पो.नि. अनामिका वानखडे, राजेन्द्र गुप्ता, उमाकांत सरोदे, छाया येलकेवाड, रुपाली पाटील, दिनेश दहातोंडे व ना.ह.सं. परिक्षेत्राचे सर्व घटकातील कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर